महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ खाली व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम ७२ खाली आदेश

जा.क्र.जिउनि/वि-१/नियमन/कलम ८८/आदेश/ 2468 /२०१७
कार्यालय जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,
वसंत नगर, आझाद वार्ड क्र.५ गोंदिया
दिनांक :- 6/4/2018

वाचावे :- १. या कार्यालयाचे क्रमांक जिउनि/वि-7/गों.जि.प्राथ.शि.सह.संस्था/कलम ८३(१) /३४११/२०१७, दिनांक ११/०५/२०१७
२ श्री.पी.एच.मेश्राम,चौकशी अधिकारी यांचा अहवाल दिनांक २०/१२/२०१७

---

ज्याअर्थी, गोंदिया जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पत संस्था मर्या.गोंदिया र.नं.०१ जि.गोंदिया ही सहकारी संस्था असून संस्थेचे कामकाज व आर्थिक व्यवहार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम तसेच पोटनियमातील तरतुदीप्रमाणे चालविणे बंधनकारक व आवश्यक आहे.

ज्याअर्थी, संदर्भिय पत्र क्रमांक 1 नुसार गोंदिया जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पत संस्था मर्या. गोंदिया र.नं.०१ जि.गोंदिया या संस्थेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ नुसार चौकशी करण्याकरिता श्री.पी.एच.मेश्राम, सहकार अधिकारी श्रेणी-1, सहकारी संस्था,तालुका सालेकसा यांची नियुक्ती करण्यात आली होती.

आणि ज्याअर्थी,वाचावे मधील संदर्भिय पत्र क्रमांक २ नुसार गोंदिया जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पत संस्था मर्या.गोंदिया र.नं.01 जि.गोंदिया या संस्थेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ खाली चौकशी करुन अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे.

*आणि ज्याअर्थी या कार्यालयाचे पत्र क्रमांक* जिउनि/वि-1/नियमन/८७७६/२०१७,दिनांक २८/१२/२०१७ नुसार संस्थेला संदर्भिय क्रमांक २ च्या अहवालावर खुलासा मागितला होता. *संस्थेचे पत्र क्रमांक* २९७/२०१८, दिनांक २४/०१/२०१८ नुसार खुलासा सादर केलेला आहे.

आणि ज्याअर्थी चौकशी अहवाल व संस्थेचा खुलासा या सर्व मुदयातील वस्तुस्थितीचा विचार करता कलम ८३ च्या अहवालातील खालील परिशिष्ठ अ मध्ये नमुद मुद्यांबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अंतर्गत खालील परिशिष्ठात दिलेल्या मुद्यांबाबत संबधितांवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झालेली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश निर्गमीत करीत आहे.

..2..

**// आदेश //**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ महाराष्ट्र शासन सहकार व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्रमांक सीएसएल/१४९३/१९६२/सी आर/४७/१४-सी. दिनांक ०७ ऑगष्ठ १९९३ अन्वये मला प्राप्त् झालेल्या अधिकारानुसार मी, संदीप यु.जाधव, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, गोंदिया जिल्हा गोंदिया याद्वारे गोंदिया जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पत संस्था मर्या.गोंदिया र.नं.०१ .जि.गोंदिया यांनी संस्थेच्या व्यवहारात केलेल्या गैरव्यवहार व अफरातफर करुन संस्थेचा विश्वासघात व फसवणूक केल्या प्रकरणांत जबाबदारी निश्चित करुन गैरव्यवहार रक्कमेची वसुली करण्यांकरीता **श्री. डी.ए.घोडेचोर,सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था, तालुका गोंदिया** यांची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ व नियम ७२ खाली चौकशी करण्यांकरीता प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे. प्राधिकृत अधिकारी यांनी सोबत जोडलेल्या परिशिष्ठ-अ नुसार संबधित आजी/माजी/सचिव/अध्यक्ष पदाधिकारी संचालक व कर्मचारी यांचे विरुध्द सविस्तर चौकशी करुन आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करावी.

तसेच अपकार्य अपयोजन तथा संस्थेचा विश्वासघात व फसवणूक केल्याबाबत भरणा करण्यांबाबत आदेश पारीत करावा व कलम ८८(२) अन्वये चौकशीचा खर्च निश्चित करुन तो खर्च कोणाकडून किती प्रमाणात वसुल करावा याचे आदेश द्यावेत. प्राधिकृत अधिकारी यांनी त्यांना प्राप्त् अधिकारात चौकशी प्रक्रिया पुर्ण करावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

करिता आज दिनांक 06/04/२०१८ ला माझे सही व शिक्यानिशी सदरहु आदेश पारीत केला आहे.

6/4/18

(संदीप जाधव)
जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था,गोंदिया.

**प्रत,**

१. **श्री.डी.ए.घोडेचोर,सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,तालुका गोंदिया** तथा प्राधिकृत अधिकारी यांना माहिती व पुढील कार्यवाहीकरिता कळविण्यांत येते की, सदरहू संस्थेची चौकशी तात्काळ ६ महिन्यांत या कार्यालयास अहवाल सादर करावा. तसेच वेळोवेळी केलेल्या कार्यवाहीबाबत दरमहा प्रगती अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२. अध्यक्ष/सचिव, गोंदिया जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी संस्था,मर्या.गोंदिया र.नं.०१ ता.गोंदिया जि.गोंदिया यांना कळविण्यांत येते की, संस्थेच्या चौकशीच्या कामकाजाकरीता येणा-या चौकशीचा खर्च रुपये २०,०००/- या कार्यालयाचे बचत खाते मध्ये ७ दिवसांत जमा करावे..

**प्रतिलिपी माहितीकरिता**

१. मा.विभागिय सहनिबंधक, सहकारी संस्था,नागपूर
२. जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था,गोंदिया.
३. सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,तालुका गोंदिया

जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था,गोंदिया.